सकाळ



**कोल्हापूर : संत रोहिदास महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहाराने अभिवादनप्रसंगी उपस्थित मान्यवर.**

# विद्यापीठात संत रोहिदास महाराज जयंती

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात आज संत रोहिदास महाराज यांची जयंती झाली. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते संत रोहिदास महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून अभिवादन केले. प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. आर. के. कामत, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. एस. एस. महाजन, राष्ट्रीय सेवा योजना समन्वयक डॉ. अभय जायभाये उपस्थित होते.

1 7 FEB 2022 पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# संपत्तीच्या हव्यासातून गरीब-श्रीमंत दरीत वाढ

## डॉ. उत्तमराव भोईटे : असमानता आणि दारिद्र्य' ग्रंथाचे प्रकाशन

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

भांडवलशाहीच्या रेट्यात अधिकाधिक संपत्ती संचयाच्या हव्यासातून जगात गरीब-श्रीमंत अशी दरी वाढते आहे, असमानतेला खतपाणी घालते आहे, असे प्रतिपादन भारती विद्यापीठ तसेच यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. उत्तमराव भोईटे यांनी केले. शिवाजी विद्यापीठाच्या सामाजिक वंचितता व समावेशक धोरण अभ्यास केंद्राच्या वतीने 'असमानता आणि दारिद्र्य' पुस्तकाच्या ऑनलाईन प्रकाशन कार्यक्रमात ते बोलत होते. शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के अध्यक्षस्थानी होते.

डॉ. भोईटे म्हणाले, दारिद्र्य आणि असमानता या अनुषंगाने प्राचीन काळापासून चर्चा होतच आली आहे. आता भांडवलशाहीच्या रेट्यात मात्र अधिकाधिक संपत्ती जमा करण्याचा हव्यास घातक ठरतो आहे. ही बाब सर्वांनाच साधत नाही आणि समाजातील आर्थिक दरी अधिकाधिक रुंदावतेच आहे.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, जगातील दारिद्र्य आणि असमानता यावर मात करण्याची अगर त्या अनुषंगाने संशोधन करण्याची जबाबदारी ही केवळ काही ठरावीक अभ्यास क्षेत्रांची अथवा संशोधकांचीच आहे असे नव्हे, तर प्रत्येक समाजघटकाचे त्यासाठी काही उत्तरदायित्व आहे, याची सर्वदूर जाणीव निर्माण होणे ही आजची खरी गरज आहे.

प्रारंभी डॉ. जगन कराडे आणि डॉ. राजेंद्र पाटील यांनी संपादित केलेल्या 'असमानता आणि दारिद्र्य' या पुस्तकाचे प्रकाशन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते करण्यात आले. त्यानंतर पुस्तकाच्या अनुषंगाने झालेल्या परिसंवादात राष्ट्रीय स्तरावरील तज्ज्ञ मान्यवरांनी सहभाग घेतला. यावेळी नवी दिल्ली येथील रावत प्रकाशनाच्या प्रणीत रावत यांनीही मनोगत व्यक्त केले. डॉ. अविनाश भाले यांनी आभार मानले.

लोकमत

# म. सु. पाटील समीक्षा पुरस्काराचे वितरण

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातर्फे देण्यात येणारा म. सु. पाटील समीक्षा पुरस्कार मराठीतील ज्येष्ठ समीक्षक, कवी, संशोधक वसंत पाटणकर यांना शुक्रवारी (दि. १८) ज्येष्ठ विचारवंत आणि भाषाभ्यासक डॉ. गणेश देवी यांच्या हस्ते प्रदान करण्यात येणार आहे. रोख रक्कम ५१ हजार रुपये आणि सन्मानचिन्ह असे पुरस्काराचे स्वरूप आहे. मराठी समीक्षेमध्ये महत्त्वपूर्ण योगदान देणाऱ्या समीक्षकांना हा पुरस्कार देऊन गौरविण्यात येते.

विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहात शुक्रवारी दुपारी साडेचार वाजता आयोजित पुरस्कार प्रदान कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, तर प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, ज्येष्ठ साहित्यिक प्रा. रंगनाथ पठारे, डॉ. राजन गवस, कवयित्री नीरजा प्रमुख उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमास साहित्यप्रेमींनी उपस्थित राहावे, असे आवाहन डॉ. रणधीर शिंदे यांनी केले आहे.

लोकसत्ता

# डॉ. ए. डी. जाधव यांना क्युबाचा पुरस्कार

**कोल्हापूर:** शिवाजी विद्यापीठाच्या प्राणिशास्त्र अधिविभागातील डॉ. ए. डी. जाधव यांनी क्युबा देशाच्या रेशीमविषयक विकासामध्ये दिलेल्या योगदानाबद्दल त्यांना क्युबा सरकारने नावीन्यपूर्ण पुरस्काराने गौरविले आहे.



डॉ. जाधव हे सन २०१२ पासून क्युबा सरकारच्या विज्ञान, तंत्रज्ञान व पर्यावरण मंत्रालयाच्या रेशीम शेतीच्या माध्यमातून शाश्वत विकासविषयक धोरणाचे सल्लागार म्हणून कार्यरत आहेत. मंत्रालयाच्या डेव्हलपमेंट ऑफ दि व्हॅल्यू चेन ऑफ सेरीकल्चर इन क्युबा ऑन सस्टेनेबल डेव्हलपमेंट या प्रकल्पावर ते मार्गदर्शक वैज्ञानिक म्हणूनही काम पाहात आहेत. त्यांच्या या योगदानाच्या गौरवाप्रीत्यर्थ पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले आहे, असे शनिवारी सांगण्यात आले.

लोकसत्ता

# सेबी मार्गदर्शकपदी डॉ. विजय ककडे

कोल्हापूर: शिवाजी विद्यापीठाच्या अर्थशास्त्र अधिविभागातील प्राध्यापक डॉ. विजय ककडे यांची सेबीचे अर्थसाक्षरता मार्गदर्शक तज्ज्ञ म्हणून पुनश्च निवड करण्यात आली आहे, असे शनिवारी सांगण्यात आले. विद्यापीठासह



परिक्षेत्राबाहेरही डॉ. ककडे यांचा अर्थतज्ज्ञ व मार्गदर्शक म्हणून लौकिक आहे. सेबी (भारतीय प्रतिभूती आणि विनिमय मंडळ, मुंबई) यांचेकडून अर्थसाक्षरता मार्गदर्शक नामिका तज्ज्ञ म्हणून त्यांची मंडळावर निवड करण्यात आली आहे. डॉ. ककडे सन २०१२ पासून अर्थसाक्षरता विषयाच्या अनुषंगाने सातत्याने व्याख्यानांच्या माध्यमांतून जनजागृती करण्यासाठी कार्यरत आहेत. त्यांनी बचत गट, युवक, कर्मचारी, महिला गट, सेवानिवृत्त कर्मचारी अशा विविध घटकांना मार्गदर्शनपर व्याख्याने दिली आहेत. या उपक्रमाअंतर्गत विविध घटकांना आर्थिक नियोजनविषयक मार्गदर्शन ते करणार आहेत.

पुढारी

# डॉ. मोहोळकर शास्त्रज्ञांच्या यादीत

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा



शिवाजी विद्यापीठाच्या पदार्थविज्ञान विभागाचे शास्त्रज्ञ डॉ. आण्णासाहेब मोहोळकर यांना २०२२ च्या जागतिक शास्त्रज्ञांच्या यादीत स्थान मिळाले आहे. अल्पेर-डोजर (एडी) सायंटिफिक इंडेक्सने यावर्षीच्या टॉप जागतिक शास्त्रज्ञांची यादी प्रसिद्ध केली आहे.

यामध्ये डॉ. मोहोळकर यांचा समावेश झाल्याने विद्यापीठालाही आंतरराष्ट्रीय स्तरावर बहुमान प्राप्त झाला आहे. त्यांना अमेरिकेच्या स्टॅनफोर्ड विद्यापीठाने घेतलेल्या सर्वेक्षणात टॉप शास्त्रज्ञांच्या यादीतही स्थान मिळाले होते. डॉ. मोहोळकर यांनी मटेरियल सायन्स क्षेत्रात केलेल्या संशोधनाची दखल जागतिक स्तरावर घेण्यात आली आहे. सध्या ते गॅस सेन्सिंग, सुपरकपॅसिटर, वॉटर स्प्लिटिंग, हैड्रोजन एनर्जी आदी विषयावर संशोधन करत आहेत.

तरुण भारत

# डॉ. अण्णासाहेब मोहोळकर जागतिक शास्त्रज्ञांच्या यादीत

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या पदार्थविज्ञान विभागाचे शास्त्रज्ञ डॉ. अण्णासाहेब मोहोळकर यांचे २०२२ च्या जागतिक शास्त्रज्ञांच्या यादीत नाव समाविष्ट झाले आहे. अल्पेर-डोजर (एडी) सायंटिफिक इंडेक्सने २०२२ ची टॉप जागतिक शास्त्रज्ञांची यादी प्रसिद्ध झाली आहे. यामध्ये डॉ. मोहोळकर यांचा समावेश असल्याने शिवाजी विद्यापीठाच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा खोवला आहे.

डॉ. मोहोळकर यांनी अमेरिकेच्या स्टॅनफोर्ड विद्यापीठाने घेतलेल्या सर्वेक्षणात जागतिक क्रमवारीत टॉप २ शास्त्रज्ञांच्या यादीत त्यांचा समावेश आहे. डॉ. मोहोळकर यांनी मटेरियल सायन्स क्षेत्रात केलेल्या संशोधनाची दखल जागतिक

- **शिवाजी विद्यापीठाच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा**



स्तरावर घेण्यात आली आहे.

सध्या ते गॅस सेन्सिंग, सुपरकपॅसिटर, वॉटर स्प्लिटिंग, हायड्रोजन एनर्जी इ. विषयावर पुढील संशोधन करीत आहेत. डॉ. मोहोळकर यांनी संशोधनामध्ये विविध विषयावर पेटंट मिळविले आहेत. त्यांनी शिवाजी विद्यापीठातून पीएच. डी. पदवी घेतल्यानंतर दक्षिण कोरिया येथून पोस्ट डॉक्टरेट पदवी मिळवली आहे. भविष्यातही समाजोपयोगी संशोधन करण्याचा त्यांचा मानस आहे.